**मुंबई मेट्रो मार्ग - ५ प्रकल्पातील टप्पा-२ (धामणकर नाका-दुर्गाडी चौक) आणि मुंबई मेट्रो मार्ग- ५ अ : दुर्गाडी-आधारवाडी-खडकपाडा-कल्याण आणि भोईरवाडी-उल्हासनगर (मुंबई मेट्रो मार्ग-५ चा विस्तार) या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास, सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास आणि मुंबई मेट्रो मार्ग -५ प्रकल्पाच्या टप्पा-१ व २ मिळून सुधारीत किंमतीस मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २२ एप्रिल, २०२६.**

**वाचा :** १) नगर विकास विभाग क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र.१३९/नवि-७ दि. २१ डिसेंबर, २०१७ रोजीचा शासन निर्णय.

२) नगर विकास विभाग क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र.१३९(भाग-२)/नवि-७ दि. ०६ जून, २०२३ रोजीचा शासन निर्णय.

**प्रस्तावना :-**

मुंबई मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी -कल्याण) या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणीस आणि सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मा. मंत्रिमंडळाच्या दि. २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत आणि दि. २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची मूळ लांबी २४.९ कि.मी असून त्यात १७ उन्नत स्थानकांचा समावेश होता. सदर प्रकल्पाकरीता रु. ८,४१६.५१/- कोटी (सर्व कर व IDC सह) इतक्या किंमतीस मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ मध्ये (ठाणे ते भिवंडी) मध्ये पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी विशेष समस्या नसल्यामुळे सदर लांबीतील स्थापत्य कामे हाती घेण्यात आली असून सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ चे काम अंतिम टप्प्यात आहे. तथापि, सदर प्रकल्पाच्या टप्पा-२ (भिवंडी ते कल्याण) मध्ये मोठ्या प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी समस्या असल्यामुळे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेला पूर्वीचा मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी - कल्याण) या रु. ८४१६ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या प्रकल्पामध्ये दि. ०६/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दुर्गाडी ते कल्याण या उन्नत मार्गिकेचे भुमिगत मार्गिकेमध्ये रुपांतर करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये रु. १४२७ कोटीची वाढ होवून प्रकल्प किंमत रु. ९८४३ कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली.

त्यानुसार प्राधिकरणामार्फत दिनांक ०७/०८/२०२४ रोजी सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता सल्लागार नियुक्त करण्यात आले. दरम्यान च्या कालावधीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०६/२०२५ रोजी मुंबई मेट्रो मार्ग -५ (ठाणे -भिवंडी- कल्याण) प्रकल्पाची

आढावा बैठक झाली. सदर बैठकीमध्ये भिवंडी शहरातील सध्याची एकंदर वाहतूक परिस्थिती लक्षात घेता, अस्तित्वातील उड्डाणपूल पाडून त्याठिकाणी एकात्मिक संरचना (उड्डाणपूल + मेट्रो) प्रस्तावित केल्यास बांधकाम कालावधीत वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन भिवंडी शहरातील वाहतूक परिस्थिती बिकट होण्याची दाट शक्यता लक्षात घेता भिवंडी शहरातील धामणकर नाका ते टेमघर या भागात अंशतः भूमिगत मेट्रो तसेच, रांजनोली जंक्शन ते दुर्गाडी चौक दरम्यान द्विस्तरीय एकत्रित संरचनेत (उड्डाणपूलासह) उन्नत मेट्रोचे बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पूर्वी मुंबई मेट्रो मार्ग-५ ची उन्नत मार्गिका कापूरबावडी, ठाणे येथून ठाणे - भिवंडी रस्त्याने भिवंडी शहरात राजीव गांधी चौक, भिवंडी येथून कल्याण रोड मार्गे राजनोली ते दुर्गाडी पर्यंत व त्यापुढे कल्याण शहरातून कल्याण शीळरोड मार्गे कल्याण APMC पर्यंत प्रस्तावित होती. सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये मुंबई मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी - कल्याण) च्या मार्गाच्या संरेखनामध्ये बदल करुन दुर्गाडी चौक ते कल्याण APMC/कल्याण मेट्रो स्थानकापर्यंत जाणारा मेट्रो मार्ग-५ चा मार्ग दुर्गाडी मेट्रो स्थानकावर समाप्त करून मेट्रो मार्ग - ५ अ दुर्गाडी स्थानकापासून सुरुवात करण्याचे प्रस्तावित केले आहे. म्हणजेच मेट्रो मार्ग - ५ चा भाग असलेला दुर्गाडी ते कल्याण APMC / कल्याण मेट्रो स्थानकापर्यंत (जुना मुंबई-आग्रा मार्ग) वगळण्याची शिफारस केली आहे. सदर मार्ग वगळून मुंबई मेट्रो -५अ (दुर्गाडी-आधारवाडी-खडकपाडा-कल्याण) व मेट्रो मार्ग ५ चा विस्तार भोईरवाडी ते उल्हासनगर असा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने मुंबई मेट्रो मार्ग - ५ टप्पा-२ (धामणकर नाका ते दुर्गाडी चौक) प्रकल्पाचा रु. ६२४८.३३ कोटी इतक्या किंमतीचा सुधारित प्रकल्प अहवाल सादर केला आहे. तसेच, प्राधिकरणाने मुंबई मेट्रो मार्ग ५ अ व मेट्रो मार्ग -५ चा विस्तार या प्रकल्पाचा रु. ४०६३.८० कोटी इतक्या प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासन मान्यतेस्तव सादर केला आहे. त्या अनुषंगाने मुंबई मेट्रो मार्ग-५ टप्पा-१ (कापूरबावडी-धामणकर नाका) व टप्पा-२ (धामणकर नाका-दुर्गाडी चौक) मिळून सुधारीत किंमतीस आणि मुंबई मेट्रो मार्ग ५ अ (दुर्गाडी-आधारवाडी-खडकपाडा-कल्याण) व मेट्रो मार्ग -५ चा विस्तार (भोईरवाडी-उल्हासनगर) या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास, सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

**०२. शासन निर्णय :-**

मुंबई मेट्रो मार्गिका- ५, ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा-१, २ व ३ ) प्रकल्पाचे महत्व विचार घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावास या शासन निर्णयाद्वारे पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे :

१) **मुंबई मेट्रो मार्गिका- ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) चा (टप्पा-१) (कापुरबावडी ते धामणकर नाका)** एकूण लांबी ११.९ किमी, ६ उन्नत स्थानके असलेल्या एकूण रु. ६,७४१.३४ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या, **मुंबई मेट्रो मार्गिका- ५ (टप्पा-२) (धामणकर नाका स्टेशन ते दुर्गाडी चौक)** एकूण लांबी १०.४७५ किमी, ६ स्थानके (५ उन्नत स्थानके, १ भूमिगत स्थानक) असलेल्या एकूण रु.

७३२६.१३ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या प्रकल्प राबविण्यास राज्य शासनाची सुधारीत मान्यता देण्यात येत आहे. तसेच, **मुंबई मेट्रो मार्गिका-५ चा विस्तार (भोईरवाडी ते उल्हासनगर) व ५ अ (टप्पा-३) (दुर्गाडी-आधारवाडी-खडकपाडा-कल्याण)** एकूण लांबी ११.८३ किमी, ७ उन्नत स्थानके असलेल्या एकूण रु. ४०६३.०८ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मुंबई मेट्रो मार्ग ५ (टप्पा-१ व २), मुंबई मेट्रो मार्ग ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा-३) या एकूण लांबी ३४.२०५ किमी, एकूण स्थानके १९ असलेल्या एकूण रु. १८,१३०.५५ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) M/s. TCE यांनी सादर केलेल्या १०.४८ कि.मी. लांबीच्या, ०६ स्थानके असलेल्या एकूण रु. ७३२६.१३ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मुंबई मेट्रो मार्ग ५ (टप्पा २) (धामणकर नाका- टेमघर- दुर्गाडी) प्रकल्पातील धामणकर नाका ते टेमघर दरम्यान भूमिगत मेट्रोचे बांधकाम करणे तसेच रांजनोली जंक्शन ते दुर्गाडी चौक दरम्यान द्विस्तरीय एकत्रित संरचनेत (उड्डाणपूलासह) उन्नत मेट्रोचे बांधकाम करण्यासाठी सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात येत आहे.

४) M/s. UMTC यांनी सादर केलेल्या ११.८३ कि.मी. लांबीच्या, ०७ स्थानके असलेल्या एकूण रु. ४०६३.०८ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मुंबई मेट्रो मार्ग ५ चा विस्तार (भोईरवाडी ते उल्हासनगर) व मेट्रो मार्ग ५ अ (दुर्गाडी-आधारवाडी-खडकपाडा-कल्याण) (टप्पा ३) प्रकल्पातील उन्नत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात येत आहे.

५) मुंबई मेट्रो मार्गिका- ५ टप्पा-१, २ व ३ या मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या वित्तीय सहभागाद्वारे निधी उभारुन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता एकूण कराच्या ७५% करांकरीता, जमीनीच्या किंमतीसाठी आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यांच्या खर्चासाठी राज्य शासनाकडून मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा १) प्रकल्पासाठी रू. ८४१.४३ कोटी, मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा २) प्रकल्पासाठी रू. १०९७.९७ कोटी आणि मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा ३) प्रकल्पासाठी रू. ५८६.४३ कोटी असे एकूण रु. २५२५.८३ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज (subordinate debt) प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर दुय्यम कर्जाची परतफेड वितरीत केल्याच्या प्रमाणात एका हप्त्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्याबाबत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या अटी व शर्ती, मूळ रक्कमेची परतफेड आणि इतर संबंधित बाबींबाबत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव/सचिव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव (नवि-१) आणि महानगर आयुक्त, मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात पूरक वित्तीय करारनामा (Subsidiary Loan Agreement - SLA) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) मुंबई मेट्रो मार्ग ५ (टप्पा-१ व २), मुंबई मेट्रो मार्ग ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा-३) या प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून रु. ६१७८.४९ कोटी रकमेच्या मर्यादेत द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज Back to Back Basis किंवा इतर उचित मार्गाने संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांद्वारे घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज घेण्याच्या अनुषंगाने वित्तीय संस्था निवडणे तसेच इतर पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांची राहील, अशी अट घालण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११) सदर नमूद मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची आकस्मिक दायित्व राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात कर्ज करारनामा करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग) आणि संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यात प्रकल्प करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य कर्ज सहाय्याच्या अटी व शर्ती, मुद्दल, व्याजाची परतफेड इ. मुद्यांबाबत अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग; अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१) व संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यामध्ये दुय्यम कर्ज करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्ज उचलण्यासाठी मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासल्यास त्यास वित्त विभागाच्या स्तरावरुन मान्यता देण्यास व केंद्रशासनास तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) सदर प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची वेळोवेळी परतफ़ेड होईल तसेच याचा भार राज्यशासनावर येणार नाही याची दक्षता घेण्याबाबतचे निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला परिशिष्ट-३ मध्ये नमूद वित्तीय आराखड्यानुसार राज्यशासनाने सोसावयाच्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात

येणार नाही, याची नोंद मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी, अशी अट घालण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१७) देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रशासनामार्फत १०% (खाजगी गुंतवणूक, जमिनीची किंमत, पुनर्वसन व पुनर्वसाहत, राज्य शासन कर वगळून) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचधर्तीवर या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता राज्यशासनामार्फत पाठपुरावा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, केंद्र शासनाच्या निधी उपलब्धतेची वाट न पाहता प्राधिकरणाचा निधी वापरुन मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१८) परिशिष्ट-५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेदरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उल्लेखीत भाडेदरांत मेट्रो रेल प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, शासनाच्या पूर्व मान्यतेने, आवश्यक ते बदल करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद घेण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१९) सदर प्रकल्पासाठी तसेच राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या खर्चाचे व प्रगतीचे मासिक परीक्षण करण्यासाठी नगर विकास विभागाच्या स्तरावर सह सचिव (नवि-७) यांच्या अध्यक्षतेखाली Project Monitoring Unit (PMU) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर मेट्रो प्रकल्प "मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, १९७८/"मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, २००९" च्या तरतुदींच्या अनुषंगाने अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) मुंबई मेट्रो मार्ग-५ प्रकल्पामधील दुर्गाडी स्थानक येथे मेट्रो मार्ग ५ टप्पा २ (धामणकर नाका-टेमघर- दुर्गाडी) व मेट्रो मार्ग-५अ या दोन्ही प्रणालींमध्ये Inter-operatibility साठी एकसमान प्रणाली यांची जोडणी प्रस्तावित असून सदर दोन्ही मार्गांची जोडणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२२) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पूनर्वसन व पूनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क/विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३) सदर मुंबई मेट्रो मार्गिका-५ प्रकल्पाला केंद्र शासनाच्या मान्यतेस विविध प्रयोजनार्थ (उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या कलम १२४B, महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १४९ तसेच इतर संबंधित कायदे/नियम) “महत्त्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प” आणि “महत्त्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४) सदर मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२५) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६) मेट्रो रेल्वे स्थानकांचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनींचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२७) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण (SPA)" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२८) मुंबई मेट्रो मार्ग-५, ५ चा विस्तार व ५ अ मेट्रो प्रकल्पामध्ये असणारी बस स्थानके, रेल्वे स्थानके, इ. यांचे मेट्रो परिवहन सेवेशी एकात्मीकीकरण करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

२९) सदर प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प पुर्णत्व खर्चामध्ये किंमतवाढ, चलन विनिमय दरांतील बदल, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल, डीपीआरमध्ये न दर्शविलेल्या आवश्यक बाबींचा समावेश, प्रकल्प उभारणीच्या विहीत मुदतीमध्ये वा त्यापुढे टाळता येणारा विलंब, अशा कारणांमुळे वाढ झाल्यास असा वाढीव खर्च स्थानिक प्राधिकरण, शासकीय/निम शासकीय संस्था त्यांच्याकडील जमिनी (डीपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) उपलब्ध करून घेऊन अशा जमिनीचे विकसन करून टीओडी, एफएसआय व इतर अनुषंगिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३०) सदर प्रकल्पाच्या खर्चात कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास, सदर वाढीचा संपूर्ण भार/दायित्व घेण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३१) मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विनामूल्य उपलब्ध करून देण्यास संबंधित विभागांना निर्देश देण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

३२) सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये दर्शविण्यात आलेल्या मेट्रो मार्गालगतच्या कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी संबंधित शासकीय / निमशासकीय

संस्थानी प्रचलित शासन नियमानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरित करण्याकरीता संबंधितांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३३) सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही याची दक्षता घेण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३४) परिशिष्ट-४ नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्त्रोतामधून उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३५) या प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्पासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दिनांक १२.१२.२००० अन्वये लागू केलेले पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासही लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नागरी क्षेत्रात ज्या ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सदनिका उपलब्ध होत नसतील त्या ठिकाणी नगर विकास विभाग शा.नि. क्र चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/न.वि.-२६ दिनांक १३.०६.२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३६) राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पातील प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि.१५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या समन्वयासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार (High Power Committee) समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प हा उच्चाधिकार (High Power Committee) समितीच्या कार्यकक्षेत आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३७) महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या तरतुदींनुसार मुंबई मेट्रो मार्गिका-५, ५ चा विस्तार व ५ अ या प्रकल्पांसाठी ट्रांझिट-ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणण्यासाठी तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३८) सदर मेट्रो रेल प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात अवाजवी वाढ होणार नाही याची दक्षता घेऊन प्रकल्पाची उभारणी विहित मुदतीत करण्यात यावी, याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३९) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसात शासनास सादर करावा.

**०३.** हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाने दिलेले अभिप्राय, या संदर्भात उच्चाधिकार समितीने घेतलेला निर्णय व दिनांक २२/४/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२२१४३४४४३१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:36:01 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ़) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
१४. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
१५. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.
१६. आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका.
१७. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१८. निवड नस्ती (नवि-७).

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७, दि. २२/०४/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-१

## मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा-१, २ व ३) या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

| मुंबई मेट्रो मार्गिका-५ प्रकल्पाचा कार्यकारी सारांश | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | घटक | मुंबई मेट्रो मार्गिका-५ टप्पा १ (कापुरबावडी ते धामणकर नाका) | मुंबई मेट्रो मार्गिका-५ टप्पा २ (धामणकर नाका स्टेशन ते दुर्गाडी चौक) | मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ टप्पा ३ (दुर्गाडी-कल्याण व भोईरवाडी ते उल्हासनगर) | एकूण |
| १ | स्टँन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. | १४३५ मि.मी. | १४३५ मि.मी. | -- |
| २ | मार्गाची एकूण लांबी (कि.मी) | ११.९०० | १०.४७५ | ११.८३० | ३४.२०५ |
| ३ | एकूण स्थानके | ६ | ६ (५ उन्नत स्थानके, १ भूमिगत स्थानक) | ७ | १९ |
| ४ | प्रस्तावित कार डेपो | कशेळी डेपो (२६.९३ हे) | | | -- |
| ५ | प्रकल्पासाठी आवश्यक जमीन | | | | |
| | अ) कायमस्वरूपी (हेक्टर) | ३०.०४ | ६.६४ | १.८० | ३८.४८ |
| | ब) तात्पुरती (हेक्टर) | ०.४० | - | ०.०२२ | ०.४२२ |
| ६ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | ऑगस्ट, २०१९ ते मे, २०२७ | डिसेंबर, २०२५ ते डिसेंबर, २०३१ ( बांधकाम सुरु झाल्यापासून ६ वर्षे) | एप्रिल, २०२५- ऑक्टोबर, २०२८ ( बांधकाम सुरू झाल्यापासून ३.५ वर्षे) | --- |
| ७ | जमिनीची किंमत (रू. कोटी) पुनर्वसन व पुनर्वसाहत (R&R) | | | | |
| अ | कायमस्वरूपी | १५५.३५ | ४५६.१३ | १९५.६० | ८०७.०८ |
| ब | तात्पुरती | ०.२१ | - | ०.०४ | ०.२५ |
| ८ | दरवाढ @५% प्रतिवर्ष (रू. कोटी) | ५०४.५५ | १०१५.३२ | २५७.७० | १७७७.५७ |
| ९ | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) (रू. कोटी) | ३१.२८ | ६२.४८ | ५७९.८७ | ६७३.६३ |
| १० | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (जमिन व सर्वकरांसहीत) (रू. कोटी) | ६,७४१.३४ | ७३२६.१३ | ४०६३.०८ | १८१३०.५५ |
| ११ | वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR) ३० वर्षांच्या विश्लेषण कालावधीसाठी | ५.११ % | ४.१६ % | ४.९८ % | ५.५५ % |
| १२ | आर्थिक परतावा दर (EIRR) वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR) ३० वर्षांच्या विश्लेषण कालावधीसाठी | २०.९५ % | १६.४६ % | १७.४५ % | १९.१२ % |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:36:17 +05'30'

(विजय चौधरी)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७, दि. २२/०४/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-२

## मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा-१, २ व ३) या प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील

| मुंबई मेट्रो मार्गिका -५ या प्रकल्पाच्या खर्चाचा सारांश | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा-१) | मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा- २) | मुंबई मेट्रो मार्ग-५ अ व ५ चा विस्तार (टप्पा -३) | एकूण |
| १ | एकूण स्थापत्य कामाची किंमत | २,२७४.५८ | ३,०२५.८६ | १३०८.६१ | ६,६०९.०५ |
| २ | एकूण प्रणालीची किंमत | २,५१८.३७ | १,३७६.३८ | १०१४.३७ | ४,९०९.१२ |
| ३ | **एकूण कामासाठी लागणारी किंमत (अ.क्र. १ +२)** | **४,७९२.९५** | **४,४०२.२४** | **२,३२२.९८** | **११,५१८.१७** |
| ४ | सविस्तर डिझाइन शुल्क (Detail Design charges) | - | ८८.०४ | - | ८८.०४ |
| ५ | सामान्य शुल्क (General Charges) | २८७.५८ | २६४.१३ | ११६.१५ | ६६७.८६ |
| ६ | वस्तू व सेवा कर / इतर कर | ९१४.४९ | ८५५.७९ | ५२१.०५ | २,२९१.३३ |
| ७ | आकस्मिक शुल्क (जमिनी शिवाय) @ ३% | ५०.०० | १६८.३१ | ६९.६९ | २८८.०० |
| ८ | **जमिनीची व पुनर्वसनाची एकूण किंमत** | १५५.५६ | ४५६.१३ | १९५.६४ | ८०७.३३ |
| ९ | **जमिनीवरील आकस्मिक खर्च** @ ३% | ४.६७ | १३.६८ | - | १८.३५ |
| १० | **जमिनीची एकूण किंमत आकस्मिक खर्चासह** | १६०.२३ | ४६९.८१ | १९५.६४ | ८२५.६८ |
| **११** | **प्रकल्प पूर्णत्वाची मूळ किंमत (जमिन व सर्वकरांसहीत) (रू. कोटी)** | **६२०५.२४** | **६२४८.३१** | **३२२५.५१** | **१५,६७९.०६** |
| १२ | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) | ३१.२८ | ६२.४८ | ५६९.८७ | ६६३.६३ |
| १३ | संभाव्य दरवाढ @५% प्रति वर्ष | ५०४.५५ | १०१५.३२ | २५७.७० | १,७७७.५७ |
| १४ | **एकूण प्रकल्प पूर्णत्वाची किंमत** | **६,७४१.३४** | **७,३२६.१३** | **४०६३.०८** | **१८,१३०.५५** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:36:29 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७, दि. २२/०४/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-३**

**मेट्रो मार्ग ५, ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा-१, २ व ३) प्रकल्पाचा एकत्रित वित्तीय सहभाग आराखडा**

| अ. क्र. | तपशील | मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा-१) | मुंबई मेट्रो मार्ग-५ (टप्पा-२) | मुंबई मेट्रो मार्ग ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा -३) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ५०६.८४ | ३६७.२५ | २२६.१९ | **११००.२८** |
| २ | राज्य शासनाचा सहभाग | | | | |
| | अ) एकूण कराचा ७५% रकमेसाठी | ६८५.८७ | ६४१.८५ | ३९०.७९ | १७१८.५१ |
| | ब) जमिनीची किंमत | १२७.४८ | ४०१.६३ | ५४.२५ | ५८३.३६ |
| | क) पुनर्वसन व पुनर्वसाहत यांचा खर्च | २८.०८ | ५४.४९ | १४१.३९ | २२३.९६ |
| | **एकूण** | ८४१.४३ | १०९७.९७ | ५८६.४३ | **२५२५.८३** |
| ३ | द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/अंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य (प्रणालीचा खर्च) | २८३३.७० | १८३२.४३ | १५१२.३६ | **६१७८.४९** |
| ४ | अंतर्देशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य (स्थापत्य कामाचा खर्च) | २५५९.३८ | ४०२८.४७ | १७३८.१० | **८३२५.९५** |
| | **एकूण पूर्णत्वाची किंमत** | **६७४१.३४** | **७३२६.१२** | **४०६३.०८** | **१८१३०.५५** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB588F874241 18BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:36:41 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट-४

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७, दि. २२/०४/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**मुंबई मेट्रो मार्ग-५ प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्रोत :-**

a. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे/ राज्य शासनाच्या नागरी परिवहन निधिमध्ये वर्ग करणे.

b. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिका/नियोजन प्राधिकरण क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून सदर वाढीव विकास शुल्काची रक्कम राज्य स्तरावरील नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे.

c. महत्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३५ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९ ब मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रयोजनातून प्राप्त रक्कम विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरणे.

d. मेट्रो कार डेपोच्या जागा तसेच प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला हस्तांतरीत जमिनींच्या वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

e. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आगमन/निर्गमन ठिकाणी, स्थानकांच्या नावांचे ब्रँडींग, डेपो, स्थानकांवरील जाहिरात तसेच ट्रेन कोचेस रॅपिंग च्या माध्यमातून जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

f. मेट्रो स्थानकांवर स्थित किऑस्क, एटीएम सेंटर्स इ. माध्यमातून मिळणारे उत्पन्न.

g. सदर विविध स्रोतांतून प्राप्त होणारा निधी हा एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" जमा करावयाचा असून तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस वापरण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रचालनादरम्यान मालमत्ता व्यवसाय आणि जाहिराती यांद्वारे तिकीट भाड्यामधून प्राप्त महसुलाच्या १०% इतके उत्पन्न अंदाजित केले गेले आहे. मेट्रो स्थानकांवरील आणि कार डेपोवरील मालमत्तेचा विकास करणे, स्थानकांवरील पार्किंग हक्कांचे लीजिंग, कोचेस आणि तिकिटांवर जाहिराती, स्थानकांमध्ये आणि पार्किंग लॉट्समध्ये जाहिराती, व्हायडक्ट्स, कॉलम्स आणि इतर मेट्रो संरचनांवर जाहिराती, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी को-ब्रँडिंग आणि नामकरण हक्क, मेट्रो परिसरामधील चित्रपटांचे चित्रीकरण आणि विविध विशेष कार्यक्रमांच्या (Events) आयोजनाद्वारे संसाधने उभारण्यात येतील.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:36:55 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८५/नवि-७, दि. २२/०४/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-५

## मुंबई मेट्रो मार्गिका- ५, ५ चा विस्तार व ५ अ (टप्पा-१, २ व ३ ) प्रकल्पाची तिकिट भाडे संरचना

| *अंतर(कि.मी.)* | ० - ३ | ३ - १२ | १२ - १८ | १८ - २४ | २४-३० | ३० - ३६ | ३६ - ४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| *भाडे(रु.)* | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.04.22 14:37:09 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन